MHPU180015152023

## निशाणी क्र.१ वरील आदेश
(दिनांक १२.०१.२०२४)

अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज भारतीय उत्तराधिकार कायदा, १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केला आहे.

२. **अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे पुढीलप्रमाणेः–**

अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील श्री. मारुती बाजीराव दिवेकर हे पारगांव, ता. दौंड, जि. पुणे येथील कायमस्वरुपीचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील मारुती बाजीराव दिवेकर हे त्यांची सुन सौ. धनश्री भारत दिवेकर यांचे मौजे पारगांव येथील मालकीचे गट क्र.३४१ मधील ऊसाला पाणी देत असतांना शेतातील महावितरणचे विजेच्या खांबाला दिलेल्या ताणाच्या तारेला अनाधाराने हात लागल्याने विद्युत धक्का (शॉक) लागुन दि.०७.०२.२०२३ रोजी निधन झाले. मारुती बाजीराव दिवेकर यांना वरील अर्जदार क्र.१ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र.१ ते ४ यांचे शिवाय वरील मयतास कोणीही कायदेशीर वारसदार नव्हते व नाही.

३. त्यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जाती परिच्छेद क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मारुती बाजीराव दिवेकर यांचा शेतातील महावितरण कंपनीचे विजेच्या खांबाच्या ताणाच्या तारेला शॉक लागुन मृत्यु झालेला असल्याने अर्जदार यांना मयताचे वारसदार म्हणुन कायद्याने महावितरण कंपनीकडुन अपघात नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क व अधिकार आहे. अर्जदारांनी सदरची विद्युत अपघातातील नुकसान भरपाई मिळण्यासाठी संबंधीत महावितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता केडगांव उपविभाग यांचे कार्यालयाकडे मागणी केली असता संबंधीत महावितरण कंपनीचे कार्यालयाने अर्जदारांना योग्य त्या सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र आणल्याशिवाय सदरची अपघात नुकसान भरपाई देणेकामी पुढील कार्यवाही करता येत नाही असे सांगितल्याने सदर विद्युत अपघात नुकसान भरपाई मिळविणेकामी अर्जदारांना वारस प्रमाणपत्र मिळणे कायद्याने आवश्यक झालेले आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. या सर्व कारणास्तव अर्जदार यांनी मयत मारुती बाजीराव दिवेकर यांचे विद्युत अपघात नुकसान भरपाई मिळण्याच्या प्रक्रियेसाठी कायदेशीर वारसदार म्हणुन वारस प्रमाणपत्र अर्जदार क्र.३ यांच्या नावे मिळावे व त्यास अर्जदार क्र.१ व २ ची संमती आहे अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. अर्ज दाखल झाल्यानंतर चौकशीचा भाग म्हणुन मी नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन सायटेशन नोटीस व वृत्तपत्र जाहीरनामा प्रसिध्द करण्याचा हुकूम दिला होता. नि.६ वरील बेलिफ रिपोर्टवरुन सायटेशन नोटीसची दि.२९.०९.२०२३ रोजी बजावणी झाल्याचे दिसुन येते. अर्जदारांनी नि.क्र.१६अ नुसार दि.१२.०९.२०२३ रोजी दैनिक "पुण्य नगरी" या वृत्तपत्रामध्ये जाहीरनामा प्रसिध्द केला. परंतु त्याला प्रतिसाद म्हणुन सदर प्रकरणात कोणीही हजर होऊन आक्षेप घेतला नाही.

५. अर्जदार क्र.३ यांनी नि.१३ वर त्यांची मागणी सिध्द करण्याकरिता स्वतःला

तपासले. अर्जदाराने त्याच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात मुळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. तसेच त्यांनी असे नमुद केले आहे की अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही मयत मारुती बाजीराव दिवेकर यांना वारस नाही. त्यांच्या सरतपासात अर्जदाराचे वडील मारुती बाजीराव दिवेकर मृत्यु प्रमाणपत्र सत्यप्रत नि.१४, अर्जदारांचे रेशनकार्ड झेरॉक्स प्रत, महावितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता केडगांव उपविभाग यांचेकडुन अर्जदारांना प्राप्त झालेल्या पत्राची प्रत नि.१५, अर्जदार क्र.१ चे आधारकार्ड पडताळीत प्रत नि.१६, अर्जदार क्र.२ ते ४ चे आधारकार्ड झेरॉक्स प्रती, दैनिक पुण्य नगरीमध्ये दिलेली जाहीर नोटीस नि.१६ व अर्जदार क्र.३ चे आधारकार्ड पडताळीत प्रत नि.१७ ही कागदपत्रे सिध्द झाली. सा.क्र.२ म्हणुन अतुल दशरथ ताकवणे यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.१८ अन्वये दाखल केलेले आहे. त्यांनी अर्जदारांच्या कथनांना पुष्टी दिलेली आहे. सा.क्र.२ चे आधारकार्ड नि.१९ वर दाखल आहे. अर्जदारांनी पुरसीस नि.२० अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

६. अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एम. चिंचोरे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

७. प्रस्तुत प्रकरणाचे बारकाईने अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जाला व पुराव्याला कोणीही हजर होउन विरोध केला नाही. त्यामुळे अर्जदारांच्या अर्जातील नमुद हकीकत, तसेच त्यांचा तोंडी व कागदोपत्री पुरावा पाहता असे स्पष्ट होते की, अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत मारुती बाजीराव दिवेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे. अर्जदारांनी मुळ अर्जात मयत मारुती बाजीराव दिवेकर यांचे कायदेशीर वारस म्हणुन अर्जदार क्र.३ यांच्या नावे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केलेली आहे. परंतु अर्जदार क्र.१, २ व ४ चे नाहरकतीबाबतचे कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. परिणामी आदेश खालील प्रमाणेः–

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ श्रीमती हिराबाई मारुती दिवेकर – पत्नी, अर्जदार क्र. २ श्री. नितीन मारुती दिवेकर – मुलगा, अर्जदार क्र. ३ श्री. भारत मारुती दिवेकर – मुलगा व अर्जदार क्र. ४ श्रेष्ठा नानासो थोरात – मुलगी हे मयत मारुती बाजीराव दिवेकर यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

३. अर्जदार क्र.१ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र न्यायालयीन शुल्क दिल्यानंतर नियमाप्रमाणे देण्यात यावे.

सही/–

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]

दिवाणी न्यायाधीश क. स्तर (न्या.क्र. १),

ता. दौंड, जि. पुणे.

ठिकाण– दौंड

दिनांक– १२.०१.२०२४

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>C.J.J.D. & J.M.F.C. (Court No. 01),<br>Tal. Daund, Dist. Pune. |
| Order date | :- | 12.01.2024. |
| Order singed by the Presiding Officer on | :- | 12.01.2024. |
| Order uploaded on | :- | 12.01.2024. |